# वसई विरार शहर महानगरपालिका

## विद्युत विभाग, मुख्यालय

### जाहिर ई-निविदा सुचना क्र. ०१ (सन - २०२६-२७) (प्रथम फेर-निविदा)

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील खालील नमुद कामासाठी सार्वजनिक बांधकाम विभागाकडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत ठेकेदारांकडून ई-निविदा मागविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | कामाचे नाव | अदांजपत्रकीय रक्कम | इसारा रक्कम रूपये | निविदा फॉम फी | सुरक्षा अनामत | कामाची मुदत |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विद्युत विभाग अत्यावश्यक सेवा, महानगरपालिका कार्यक्षेत्रात नैसर्गिक आपत्तकालीन कालावधीत नादुरुस्त विद्युतीय साहित्यांची दुरुस्ती करणे. | रु.४९,९४,३२४/- | ५०,०००/- | रू.५००/- +१८% GST ५९०/- | २% डी.डी.ने व २% देयकातुन | १ वर्ष (३६५ दिवस) |

**निविदेचे वेळापत्रक**

| तपशील | दिनांक | | वेळ |
|---|---|---|---|
| **संकेतस्थळावरून ई-निविदा प्रसिद्धी व डाउनलोड करणेचा दिनांक** | दि. १९/०५/२०२६ | पासून ते दि. २६/०५/२०२६ पर्यंत | स. ११.०० वा. पर्यंत |
| **ई- निविदा सादर करणेचा अंतिम दिनांक** | दि. २६/०५/२०२६ | पर्यंत | स. ११.०० वा. पर्यंत |
| **ई- निविदा उघडणेची वेळ व दिनांक** | दि. २९/०५/२०२६ | नंतर (कार्यालयीन सोयीनुसार) | स. ११.०० वा. पर्यंत |
| **कार्यालयाचा पत्ता** | वसई विरार शहर महानगरपालिका मुख्यालय, यशवंत नगर मार्ग, विराट विनायक मंदिरच्या बाजुला, विरार (प.), तालुका: - वसई, जिल्हा: - पालघर. | | |

**पात्रता नोंदणी करीता आवश्यक कागदपत्रे: -**

ई-निविदा सादर करताना लखोटा क्र.१ मध्ये खाली नमुद आवश्यक / मागणी कागदपत्रांच्या स्कॅन प्रती पी.डी.एफ (PDF) फॉरमेट मध्ये अपलोड करणे ठेकेदारावर बंधनकारक राहील.

a) विद्युत ठेकेदार अनुज्ञाप्तीची छायांकीत प्रत.
b) सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) यांचेकडील किमान रुपये ५० लक्ष किंवा त्यावरील रक्कमेचे काम करणेंची क्षमता असलेले नोंदणी प्रमाणपत्राची छायांकीत प्रत.
c) मागील ३ वर्षांचे आयकर प्रमाणपत्र.
d) बॅलेन्स शीट.
e) प्रॉफिट अॅन्ड लॉस स्टेटमेंट.
f) जी.एस.टी. नोंदणी प्रमाणपत्र व पॅनकार्ड.
g) बोली क्षमता: - (अ x न x २) – ब

येथे अ = गेल्या पाच वर्षांतील कमाल वार्षिक उलाढाल (सध्याच्या दरानुसार).
न = देय कामाचा कालावधी.
ब = हाती असलेल्या कामाचा खर्च (निविदा कालावधी दरम्यान).

(निविदा कालावधीत कामाची अद्ययावत आणि अचूक किंमत कंत्राटदराने सादर करणे बंधनकारक आहे)

टिप: - सार्वजनिक बांधकाम विभागातील कंत्राटदारांची निविदा भरण्याची क्षमता ऑनलाईन पध्दतीने तयार करण्याकरीता Bid Capacity & Technical Manpower संगणक कार्यप्रणाली विकसित केलेली आहे. सदर ऑनलाईन संगणक प्रणाली www.mahapwd.gov.in हया सा. बां. विभागाच्या संकेतस्थळावर "bidcap.emahapwd.com" या Link व्दारे उपलब्ध आहे. शासन निर्णय दि. ११/५/२०२२ अन्वये रू.३० लक्ष किमतीवरील सर्व कामांकरीता तसेच ज्या कंत्राटदाराने एका वित्तीयवर्षात ३ कामे रु.३० लक्ष किंवा त्यापेक्षा अधिक किंमतीची कामे घेतली आहे, अशा कंत्राटदारांना त्या वित्तीय वर्षात कामे घ्यावयाची असल्यास सा. बां. विभागात निविदा भरताना Bid Capacity & Technical Manpower हया Web Based संगणक प्रणालीचा वापर करुन Bid Capacity व Technical Manpower Deployment प्रमाणपत्र, निविदा सादर करतांना अपलोड करणे अनिवार्य राहील.

h) ई.पी. एफ / ई.एस.आय.सी. रजिस्ट्रेशनची प्रत.
i) रु.५००/- स्टॅम्पपेपरवर प्रतिज्ञापत्र (परिशिष्ट-अ) (रजिस्टर नोटरी आवश्यक).
j) रु.५००/- स्टॅम्पपेपरवर सत्यप्रतिज्ञापत्र (परिशिष्ट-ब) (रजिस्टर नोटरी आवश्यक)
k) ऑनलाईन इसारा रक्कम भरल्याची पावती.
l) अनुभव प्रमाणपत्र: - शासकीय, निमशासकीय संस्था, शासकीय महामंडळे इ.ठिकाणी सार्वजनिक दिवाबत्ती व्यवस्थाचे काम पूर्ण केल्याचा अनुभव खालील प्रमाणे कोणताही असावा.
   अ) तीन सारख्या पध्दतीचे कामे ज्यांची काम निहाय किंमत रक्कम १९.९८ लक्ष रु. पेक्षा कमी नसावी. किंवा
   ब) दोन सारख्या पध्दतीचे कामे ज्यांची काम निहाय किंमत रक्कम २४.९७ लक्ष रु. पेक्षा कमी नसावी. किंवा
   क) एक सारख्या पध्दतीचे काम ज्यांची काम निहाय किंमत रक्कम ३९.९५ लक्ष रु. पेक्षा कमी नसावी. (शासन निर्णय क्र. संकीर्ण २०१९/प्र.क्र.४७/इमारती-२ दि.२५ ऑक्टोंबर २०१९)
m) हाती असलेल्या व पूर्ण केलेल्या कामांची यादी.
n) निविदाधारक काळ्या यादीत समाविष्ट नसल्याचे त्यांचा लेटर पॅड वर स्वत: साक्षांकीत केलेले स्वय: घोषणापत्र.
o) निविदा सुचना, CVC, GFR चे सर्व नियम व अटी शर्ती मान्य असल्याबाबतचे प्रमाणपत्र.

**<u>अटी व शर्ती: -</u>**

१) कामाचे स्वरुप व कामाची व्याप्ती (SOW) निविदा फॉर्ममध्ये नमुद करणेंत आले आहे.

२) ई-निविदा भरताना द्विलखोटा पद्धतीचा अवलंब करावा. त्यापैकी लखोटा क्र.१ मध्ये तांत्रिक बाबींची व कागदपत्रे स्कॅन करुन पी.डी.एफ (PDF) फॉरमॅट मध्ये अपलोड करावीत.

३) ई-निविदा उघडताना प्रथम तांत्रिक बाबींचा लखोटा क्र.१ उघडण्यात येईल व पात्रता नोंदणी मध्ये नमुद केलेली आवश्यक / मागणी कागदपत्रे असल्याची खात्री झाल्यावर वित्तीय बाबीचा लखोटा क्र.२ उघडण्यात येईल. आवश्यक / मागणी कागदपत्रे नसलेली ई-निविदा विचारात घेतली जाणार नाही व अश्या निविदा अपात्र ठरविणेत येतील. निविदा मंजुरी व नंतर देयके अदा करताना जोडलेली कागदपत्रे खोटी व बनावट असल्याची बाब निविदा उघडल्यानतंर निदर्शनास आल्यास कंत्राटदार पुर्णपणे जबाबदार राहिल. सार्वजनिक बांधकाम विभागाचे व निविदा छाननी करणारे अधिकारी जबाबदार राहणार नाही. (महाराष्ट्र शासन सार्वजनिक बांधकाम विभाग याचेकडील शासन निर्णय क्र. सीएटी२०१८/प्र.क्र१२७/ईमार मंत्रालय मुंबई दि.२८/११/२०१८ नुसार निविदेसोबत सादर करण्यात आलेली कागदपत्रे खोटी आढळून आल्यास भारतीय दंड विधान संहितेच्या कलम अंतर्गत संबधित कंत्राटदाराविरुद्ध फौजदारी गुन्हा दाखल करणेत येईल. याची सर्वस्वी जबाबदारी ऑनलाईन खोटी कागदपत्रे सादर करणारे कंत्राटदार यांची असेल याची नोंद घ्यावी.)

४) निविदा फॉर्म फी, इसारा रक्कम व सेवा शुल्क ऑनलाईन पेमेंट गेटवेद्वारे भरावयाचे आहे. वरील सर्व शुल्क डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड, नेट बँकींग, RTGS, NEFT मार्फत भरणा करता येतील. निविदा फॉर्म फी व इसारा रक्कम रोखीने, धनादेश किंवा धनाकर्षाद्वारे वसई-विरार शहर महानगरपालिकेत स्विकारली जाणार नाही.

५) सार्वजनिक बांधकाम विभाग, शासन परिपत्रक क्रमांक सीएटी/२०१७/प्र. क्र.०८/इमा-२, दि.२६ नोव्हेंबर २०१८ अन्वये अंदाजपत्रकिय रक्कमेपेक्षा कमी किंमतीच्या देकार सादर करणाऱ्या निविदाधारकांनी लिफाफा क्र.२ उघडल्यानंतर Additional Performance Security Deposit चा डी.डी. आठ दिवसांच्या आत या कार्यालयात जमा करावा. ही आठ दिवसांची मुदत कोणत्याही कारणांसाठी शिथीलक्षम असणार नाही.

६) अंदाजपत्रकिय रक्कमेपेक्षा कमी किंमतीच्या देकार सादर करणाऱ्या निविदाधारकांनी वरील विहित मुदतीत Performance Security Deposit चा भरणा केला नाही, तर अनुक्रमे पुढील न्युनतम निविदाकारास लेखी विचारणा करण्यात येईल व सदर निविदाकार L-१ निविदाकाराच्या दराने काम करण्यास तयार असतील तर त्यांची निविदा मंजुर करण्यात येईल.

७) अंदाजपत्रकिय रक्कमेपेक्षा कमी किंमतीचा देकार असल्यास इसारा रक्कम बरोबर अतिरिक्त जमा करावा लागणारे परफॉर्मन्स सिक्युरिटी पुढील प्रमाणे: -

८) i) प्राप्त निविदेचा देकार निविदाधीन कामाच्या किंमतीपेक्षा १०% पर्यंत कमी दरांचा असेल अशा ठेकेदारांनी निविदाधीन किंमतीच्या १% एवढ्या रक्कमेचा धनाकर्ष (Demand Draft) परफॉर्मन्स सिक्युरिटी म्हणून निविदेच्या लिफाफा क्र.२ मध्ये सादर करावा. (उदा.१% ते १०% कमी दर- १% रक्कम)

ii) प्राप्त निम्नतम निविदेचा कामाच्या किंमतीपेक्षा १०% पेक्षा जास्त दराने कमी असेल दर देकार १०% पेक्षा जेवढ्या जास्त दराने कमी आहे. तेवढ्या रक्कमेचा व वरील बाब - ८ प्रमाणे येणाऱ्या रक्कमेसह एकत्रित धनाकर्ष (Demand Draft) निविदेसोबत लिफाफा क्र.२ मध्ये सादर करावा. (उदा.१४% कमी दर - १०% पर्यत करिता - १% टक्का व (१४% - १०% = ४%) असे एकूण ५%)

iii) देकार १५% पेक्षा कमी दराचा असल्यास उर्वरित रक्कमेसाठी दोन पटीने रक्कम डी.डी.ने सादर करणे अनिवार्य राहील. (उदा.१९% कमी दरासाठी पुढील प्रमाणे पृथ: करण: - १०% कमी दरापर्यंत १% व १५% कमी दरापर्यंत (१५%-१०%=५%) तसेच (१९%-१५%=४%) करिता (४%x२%=८%) असे एकुण (१%+५%+८%=१४%)

९) शासन परिपत्र १६/११/२०१८ नुसार परफॉर्मन्स सिक्युरिटीच्या डिपॉझीटचा धनाकर्ष (डी.डी) सिलबंद लिफाफा मधुन निविदाधारकाने लिफाफा क्र. १ व लिफाफा क्र. २ उघडल्यानंतर ८ दिवसांच्या आत विद्युत विभागात जमा करावा. लिफाफा वर कामाचे नाव व निविदा सुचना क्र. लिहिण्यात यावा. परफॉर्मन्स सिक्युरिटीच्या डिपॉझीटचा धनाकर्ष द्वितीय लखोटा उघडल्याचे दिनांकापासुन आठ दिवसांत सादर न केल्यास निविदा अपात्र ठरविण्यात येईल.

१०) निविदा उघडल्यानंतर लिफाफा क्र. १ मधील कागदपत्रांची पुर्तता न झाल्यास संबंधित कंत्राटदारांना त्यांच्या धनाकर्षाचे लिफाफे निविदा उघडल्याच्या दिनांकापासुन ८ दिवसांत परत करण्यात येईल.

११) निम्नतम निविदाकारांना कार्यादेश दिल्यानंतर ३ दिवसांत क्र. २ चे निम्नतम निविदाकारांचा धनाकर्ष परत करण्यात येईल.

१२) वरील पध्दतीमध्ये खोटी कागदपत्रे / धनाकर्ष सादर करणाऱ्या कंत्राटदारांची अनामत रक्कम (EMD) जप्त करण्यात येईल व संबंधित कंत्राटदाराला काळया यादीत सामाविष्ट करण्यात येईल. यासंबंधी मा. आयुक्त यांना पुर्ण अधिकार राहतील.

१३) ई-निविदा सादर करताना निविदा पत्रक पोस्टाने किंवा कुरीयरने पाठवू नये. पोस्टाने व कुरीयरने पाठविलेली निविदा स्विकारली जाणार नाही. ई-निविदा महानगरपालिकेने ठरवून दिलेल्या तारखेपर्यंत व वेळेत ऑनलाईन https://mahatenders.gov.in येथे सादर करणे बंधनकारक राहिल.

१४) निविदाधारकाने "बीड लॉक" झाल्यानंतर ७२ तासांच्या आत स्वतः साक्षांकित केलेली हार्ड कॉपी विभागात सादर करणे आवश्यक आहे. प्रत्येक कागदपत्र कंत्राटदाराने स्वतः साक्षांकित केली पाहीजे. जरी हार्ड कॉपी ऑनलाइन निविदेसोबत सादर केली नसली तरीही तांत्रिक लिफाफा उघडला जाईल. (शासन निर्णय क्रमांक सीएटी-२०१९/प्रा-क्र.१२०/इमारती-२, दि.१७/०९/२०१९, परिच्छेद क्रमांक ८ नुसार).

१५) निविदाधारकाने दर मुळ किंमत (वाहतुकीसह) व GST (टक्केवारी व रक्कमेत) दिलेल्या रकान्यामध्ये स्पष्ट नमुद करावी.

१६) निविदाधारकास शासनाकडुन भविष्यात होणारी करा संबंधी वाढ/घट लागू राहिल.

१७) निविदेमध्ये नमुद केल्याप्रमाणे वार्षिक परिमाण (Appox. Annual Required Quantity) हे अंदाजित असून त्यामध्ये वाढ/घट होऊ शकते. त्याबाबत कुठलाही दावा करता येणार नाही.

१८) निविदा कालावधीत बाजारभावात वाढ झाल्यास निविदेत दिलेल्या मंजुर दराने काम करणे बंधनकारक राहील.

१९) निधी उपलब्धतेनुसार व वितरणानुसार देयक अदा केले जाईल याची नोंद घ्यावी.

२०) पूर्ण झालेल्या कामाचे देयकासोबत उपांग निहाय GEO Tag Photo सादर करणे आवश्यक राहील.

२१) भाववाढ: - कामासाठी १००% अर्थसंकल्पीय तरतूद असल्यामुळे दरवाढ तरतूद (Price Escalation) लागू नाही. (शासन निर्णय क्रमांक सीटी/२०१७/ प्र. क्र.०८/ इमा-२, दि.२७/०९/२०१८, परिच्छेद क्रमांक २.९.५ नुसार.)

२२) सदर कामे करीता देखभाल दुरुस्ती करताना नेमण्यात आलेल्या कर्मचाऱ्यांस इजा / अपघात झाल्यास त्याची संपुर्ण जबाबदारी ठेकेदाराची राहील.

२३) निविदा मंजुर झाल्यानंतर मंजुर ठेकेदारने अंदाजित खर्चाचा २% महानगरपालिकेकडे डिमांड ड्राफ्टव्दारे भरणा करुन करारपत्र करावयाचे आहे व नंतर देयक अदा करताना २.५% सुरक्षा अनामत रक्कम देयकातुन वेळोवेळी कपात करण्यात येईल.

२४) निविदेसोबत भरलेली सुरक्षा अनामत रक्कम अंतिम देयक अदा केल्यानंतर परत करण्यात येईल.

२५) ई-निविदेसोबत भरलेल्या अनामत रक्कमेवर कोणत्याही स्वरूपात व्याज दिले जाणार नाही.

२६) जीएसटीची रक्कम शेड्यूल -B मध्ये नमूद केल्याप्रमाणे बिलाच्या वेळी काम केलेल्या रकमेवर स्वतंत्रपणे दिली जाईल.

२७) जर कंत्राटदार सुशिक्षित बेरोजगार अभियंता असेल, तर त्याला शासन निर्णय क्रमांक सीएटी2017/प्र. क्रं.69/इमारत-2, दिनांक 31 मे, 2018 नुसार तांत्रिक कागदपत्रांमध्ये रु. 500/- चे हमीपत्र सादर करावे लागेल. जर बेरोजगाराने त्याच्या तांत्रिक कागदपत्रांतर्गत कागदपत्रे सादर केली नसतील तर बोली नाकारली जाईल.

२८) लवादाची तरतूद (Arbitration clause) - "संबंधित विभाग प्रमुख आणि कंत्राटदार यांच्यात चर्चेनंतर वादाचे निराकरण झाले नाही तर, वादाचे सामंजस्याने निराकरण करण्यासाठी हा वाद महानगरपालिकेच्या आयुक्तांकडे पाठवला जाईल, जर पक्षांमध्ये असा सौहार्दपूर्ण तोडगा निघाला नाही, तर पक्षांमधील वाद केवळ वसई न्यायालयांच्या विशेष अधिकारक्षेत्रात येतील. हे स्पष्ट करण्यात येते की हे तरतूदीतील नोंदीचा अर्थ असा होईल की महानगरपालिका आयुक्त लवाद (Arbitration) म्हणून काम करतील".

२९) निविदा प्रक्रियेचा तपशिल वर नमुद केलेल्या सांकेतस्थळावर (वेब साईटवर) उपलब्ध होईल.

३०) ठेकेदाराने निविदेत भरलेले कमीत कमी दराप्रमाणे उत्कृष्ट दर्जाचे काम करुन देणे बंधनकाकरक राहील.

३१) सदर निविदेस मुदतपूर्वी संपुष्टात आणण्याचा किंवा दरात कोणतीही वाढ न देता पुढील ६ महिने कालावधीमध्ये मंजुर दराप्रमाणे काम करणे कामी मुदतवाढ देण्याचा अधिकार आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांचा राहिल.

३२) धनाकर्ष उपलब्ध करुन देणे / धनाकर्ष परत करणे व इतर बाबींबाबत खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

- ❖ धनाकर्ष / बँक प्रतिपुर्ती हमी आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिकेच्या नावे असावा.
- ❖ धनाकर्ष / बँक प्रतिपुर्ती सरकारी बँक व शेडयुल बँकांकडुन काढलेला असावा.
- ❖ धनाकर्ष बँकेचा MICR व IFSC कोड नंबर असणे आवश्यक आहे.
- ❖ धनाकर्ष / बँक प्रतिपुर्ती हमी प्रत Scan करुन ई-निविदा भरताना ठेकेदारांनी अपलोड करावी. धनाकर्ष / बँक प्रतिपुर्ती हमी सिलबंद लिफाफ्यातुन कंत्राटदारांनी निविदा स्विकृतीच्या दिनांकापासुन विद्युत विभाग, मुख्य कार्यालयात जमा करावा.

३३) निविदा संबंधी अधिक माहीतीकरिता विद्युत विभाग, मुख्यालय, विरार (प) येथे संपर्क साधावा.

३४) ई-निविदेमधील दर पूर्णपणे किंवा अंशत: स्विकारणे किंवा आलेल्या सर्व निविदा नाकारणेचा अधिकार आयुक्त, वसई विरार शहर महानगरपालिका यांनी राखून ठेवला आहे.

जावक क्र.: वविशम /मु. विद्युत/ ६०९ /२०२६
दिनांक : - १४|०५|२०२६

(अमोल जाधव)
प्र. कार्यकारी अभियंता (विद्युत)

# ५०० रुपये स्टॅम्प पेपरवरील नमुना
## (परिशिष्ठ "अ")
## प्रतिज्ञापत्र

मी / आम्ही याव्दारे असे नमुद करतो की, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १० व कलम ११ तरतुदीच्या खाली उतंधृत केलेल्या आहेत. माहिती आहे आणि गंभिरपणे नमुद करतो की, महानगरपालिकेशी किंवा महानगरपालिकेच्या अधिन किंवा महानगरपालिकेच्या वतीने करण्यात येणाऱ्या संविदेमध्ये नगर परिषदेच्या कोणत्याही नगरसेवकाचा कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध आमच्याशी नाही.

(कलम १० :- यापुढे तरतुद केली असेल त्या व्यतिरीक्त, महानगरपालिकेच्या आदेशावरुन केलेल्या कोणत्याही कामात किंवा, महानगरपालिकेशी किंवा अधिन किंवा महानगरपालिकेने किंवा महानगरपालिकेच्या वतीने केलेल्या कोणत्याही संविदेमध्ये जीचा स्वत:चा किंवा आपल्या भागीदारामार्फत प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्षरित्या कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल.)

(कलम ११ :- पालिका सदस्य म्हणुन किंवा महानगरपालिकेच्या कोणत्याही समितीचा सदस्य म्हणुन ज्या कोणत्याही बाबीतीत कलम १० व कलम ११ मध्ये वर्णन केल्याप्रमाणे त्याचा किंवा त्यांच्या भागीदारीचा प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष रितीने कोणताही हिस्सा किंवा हितसंबंध असेल मग अश्या हिश्याची किंवा हितसंबंधाची किंमत काहीही असो, किंवा जीत ज्याचा अशीलाच्या, प्रकत्याचा किंवा इतर व्यक्ती च्या वतीने व्यवसायीकदृष्टया त्याचा हिस्सा किंवा हितसंबंध असेल अशा कोणत्याही बाबतीत मतदान करील.)

निविदाधारकाचे नाव :-

पत्ता :-

दिनांक :-

निविदाधारकाची सही

साक्षीदाराचे नाव :-

पत्ता :-

दिनांक :-

साक्षीदाराची सही

# ५०० रुपये स्टॅम्प पेपरवरील नमुना

## (परिशिष्ठ "ब")

## सत्यप्रतिज्ञापत्र (Affidavit)

मी श्री.____________________ वय __________ वर्ष राहणार ____________________________ ________________________________ या सत्यप्रतिज्ञापत्राद्वारे लिहून देतो की, मी मे.________________________________ या फर्मचा / कंपनीचा मालक असुन _______________________________________________________________ या कामासाठी आम्ही इच्छुक आहे. सदर कामाकरीता सादर केलेली कागदपत्रे खरी, बरोबर व पुर्ण आहेत. त्यामध्ये कोणत्याही त्रुटी चुका नाहीत. याची मी खात्री केलेली असुन असे शपथपुर्वक खालील अटी व शर्तीसह मान्य करीत आहे. या कागदपत्रामध्ये काही चुकीची, दिशाभुल करणारी, खोटी व तसेच अपुर्ण माहिती आढळल्यास मी भारतीय दंडसहित अंतर्गत कायदेशिर कारवाहीस पात्र राहीन.

१. जर कंत्राट कालावधी दरम्यान, मी माझ्या कार्यालयाने किंवा माझ्या कर्मचा-यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला/ विद्युत विभागाला कोणतीही खोटी माहिती किंवा देयक समवेत तसेच पत्रव्यवहार खोटी/ बनावट साहित्य खरेदीची कागदपत्रे सादर केली असल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कारवाहिस पात्र राहीन.

२. जर कंत्राट कालावधी दरम्यान, आणि काम समाप्ती नंतर, अंतिम देयक देण्याच्या तारखेपर्यत सादर केलेले कोणतेही खोटी/ बनावट किंवा फसवी आढळयास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कारवाहीस पात्र राहीन.

३. जर काम समाप्तीनंतर दोष दायित्व कालावधी दरम्यान किंवा त्यानंतर कोणत्याही वेळी, कोणतीही माहिती किंवा कागदपत्रे खोटी / बनावट, फसवी किंवा दिशाभुल करणारी आढळल्यास, मी भारतीय दंडसंहिता अंतर्गत कायदेशीर कार्यवाहीस पात्र राहीन.

कंत्राटदाराची सही व शिक्का

# नमुना बंधपत्र (रु. ५००/- च्या स्टॅम पेपरवर)

## (परिशिष्ठ "क")

सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यानी / ई- निविदेत भाग घेताना प्रत्येक कामासोबत सादर करावयाचे

## बंधपत्र

मी,---------------------------------------------------------------- शपथ पत्रलिहून देतो की, माझी सुशिक्षित बेरोजगार अभियंता अंतर्गत वर्ग ४ मधील नोंदणी --------------------------------------------------------------- पर्यंतग्राह्य आहे. सद्यस्थितीत मी कोणत्याही शासकीय / निमशासकीय / खाजगी संस्थेत कार्यरत नाही. तसेच कोणतेही पुढील शिक्षण घेत नसून सदर काम मी स्वतः करणार आहे.

उपरोक्त बाबतीत असत्यता आढळून आल्यास होणाऱ्या कार्यवाहीस मी व्यक्तिशः जबाबदार राहिल.

असत्येमुळे माझी सुशिक्षित बेरोजगार अभियंता म्हणून नोंदणी रद्द करण्यात आल्यास माझी कोणतीही हरकत असणार नाही.

सही -

नांव -

Signature Not Verified

Digitally signed by AMOL BALKRISHNA JADHAV
Date: 2026.05.19 17:56:39 IST
Location: Maharashtra-MH